सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

जा.क्र. शातंमि/रासेयो /२०२६/ 1213 दिनांक:- १३ ऑगस्ट २०२६

## परिपत्रक

**विषय:** 'हर घर तिरंगा' अभियान संस्थेमध्ये साजरा करणेबाबत....
**संदर्भ:** जा.क्र. मरातंशिमं/ विकापु/आस्था /२०२६/१३०; दिनांक १३ ऑगस्ट २०२६.

संस्थेतील सर्व विद्यार्थी, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार संस्थेत **'हर घर तिरंगा'** अभियान आयोजित केले जात आहे. या वर्षीचे अभियान **'वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्षाला** समर्पित आहे. त्यानुषंगाने खालील उपक्रमांत सर्वांचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे.

१. **राष्ट्रीय ऑनलाईन क्विझ:** १ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सर्व विद्यार्थ्यांनी **'MyGov'** पोर्टलवरील **(https://quiz.mygov.in)** राष्ट्रीय क्विझमध्ये भाग घ्यावा.
२. **फाळणी इतिहास प्रदर्शन व लघुपट:** १३ ऑगस्ट पासून केंद्र शासनाचे विशेष लघुपट (The New Post Box, Chan Kithan) दाखवले जातील.
३. **'वंदे मातरम' सामूहिक गायन:** अभियानाचे औचित्य साधून संस्थेतील सर्व सांस्कृतिक व शासकीय कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम' चे सामूहिक गायन केले जाईल.
४. **सांस्कृतिक स्पर्धा:** विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर गीत गायन व रांगोळी स्पर्धांचे आयोजन केले आहे.
५. **'Selfie with तिरंगा':** सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजासोबत सेल्फी काढून तो **'MyGov'** पोर्टलवर **https://harghartiranga.com/selfie** अपलोड करावा.

**महत्त्वाच्या सूचना:-**
१. सर्व उपक्रम राष्ट्रध्वजाचा पूर्ण आदर व आचारसंहिता (Flag Code) राखूनच पार पाडले पाहिजेत.
२. सर्व विभागप्रमुखांनी आपल्या स्तरावर या उपक्रमांचे नियोजन करून विद्यार्थ्यांची उपस्थिती निश्चित करावी व या सर्व उपक्रमाबाबतचा अहवाल 'राष्ट्रीय सेवा योजना' या विभागाकडे पाठवावा.

(डॉ.एस.ए.परदेशी)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

प्रत- १. सर्व विभागप्रमुख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता,
२. विद्यार्थी नोटीस बोर्ड, ३. संस्था संकेतस्थळ.